**आर.सी.सी.क्र.२२५/२०२४**

**निशाणी क्र.** ३६

**आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचा जबाब**

आरोपीचे नाव :- संदिप कान्हु वानरे,
वय :- ३१ वर्षे,
राहणार :- प्रवरासंगम, ता. नेवासा, जि.अहमदनगर.

| | |
|---|---|
| प्रश्न १ | तुम्ही सरकार पक्षाचा पुरावा ऐकला आहे का ? |
| उत्तर | होय |
| प्रश्न २ | तुम्हाला विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देणे तुमच्यावर बंधनकारक नाही, परंतु तुम्ही दिलेली उत्तरे तुमच्या विरूध्द पुरावा म्हणुन वापरली जातील? |
| उत्तर | होय |
| प्रश्न ३ | **साक्षीदार क्र.१ जयश्री दिपक वानरे,** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, त्यांच्या घरी दोन मुली व एक मुलगा, सासु व पती असे राहतात, घटना दि. २४.१२.२०२३ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शेताच्या रस्त्यावर घडली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यादिवशी पाणी आणण्याकरीता तिचा मुलगा अजय व मुलगी प्रणाली असे गेले होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही तिच्या मुलीला व मुलीला रस्त्यात आडवले व इकडून जायचे नाही असे म्हणुन तंगडया काढुन टाकीन अशी धमकी दिली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, आरडा ओरडा ऐकुण ती तिकडे गेली, त्यावेळी मुलगा तिला म्हणाला की, काका असे म्हणत आहेत, त्यावेळी ती त्यांना भांडण करू नका असे सांगत होती, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही तिचा हात धरून तिच्या छातीला हात लावुन तिला पाठीमागे लोटले, त्यानंतर ती घरी गेली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |

| | |
|---|---|
| प्रश्न ८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तिचे पती आल्यानंतर तिने सर्व हकीगत सांगितली, त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटी तक्रार दाखल केली |
| प्रश्न ९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तिला सदरील फिर्याद दाखविण्यात आली, तिने नि.१६ वरील फिर्याद शाबीत केली आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे सांगत आहे |
| प्रश्न १० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तसेच तिचा न्यायालयात फौजदारी प्रकिया संहिता कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला, तो जबाब नि.१७ वर तिने शाबीत केला आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा जबाब नोंदवला आहे |
| प्रश्न ११ | **साक्षीदार क्र.२ बाबासाहेब काशीनाथ म्हस्के,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, दि. २५.०२.२०२३ रोजी पोलिसांनी त्यांना शेत गट नं. ३३ व ३७ या तुमच्या शेतामध्ये घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलविले होते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्या ठिकाणी भांडण झाले होते, मुले पाणी आणण्यासाठी जात होते, त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा पंचनामा तयार केला |
| प्रश्न १३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्या ठिकाणी बरेचशे लोक होते, त्यांना घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यांनी नि.२१ वरील घटनास्थळ पंचनामा शाबीत केला आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १४ | **साक्षीदार क्र.३ अजय दिपक वानरे,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांच्या घरामध्ये त्याचे आई वडील, आज्जी, त्याच्या दोन बहिणी प्रणाली व प्रांजल व तो रहातो, फिर्यादी ही त्याची आई आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न १५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्याचे आई वडील शेती करतात व त्यावर त्यांची उपजिवीका चालते, ते राहण्यास बकुपिंपळगाव येथे शेतामध्ये आहेत, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | सांगता येणार नाही |
| प्रश्न १६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांच्या घरी |

Aanne

| | |
|---|---|
| | जाण्या येण्याचा रस्ता तुमच्या शेतामधुन आहे, दि. २४.१२.२०२३ रोजी संध्याकाळी चार ते पाच च्या दरम्यान तो व त्याची बहिण प्रणाली असे मिळुन पाणी आणण्यासाठी प्रवरासंगम येथे तुमच्या शेतातील रस्त्याने जात हेते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही त्यांना म्हणाले की, तुझया बापाचा रोड आहे काय, हा माझा रस्ता आहे, तसेच तुम्ही म्हणलात की, पुन्हा दिसलात तर हात पाय तोडुन टाकीन, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यावेळी त्याने त्याच्या आईला अवाज देवुन त्याठिकाणी बोलवुन घेतले व घडलेली घटना सांगितली, त्यावेळी त्याची आई तुम्हाला समजावून सांगत असतांना त्यावेळी तुम्ही त्याच्या आई सोबत झटु लागला व तिस लोटु लागला, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते तिघे घरी गेले, त्यानंतर शेतात काम करणारे त्याचे वडील घरी आहे व त्यांनी घटना वडीलांना सांगितली, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते पोलीस ठाण्यात आले व फिर्याद दाखल केली, तो तुम्हाला ओळखतो, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटी फीर्याद दिली, एकाच गावातील असल्याने ओळखतो |
| प्रश्न २१ | **साक्षीदार क्र.४ प्रणाली दिपक वानरे,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, ती त्रिमुर्ती शाळेमध्ये आहे, ती इंग्लिश माध्यमातुन सी.बी.एस.सी पॅटर्नमध्ये शिकते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न २२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांच्या घरात ती, तिचे आई वडील, आज्जी द्वारकाबाई, बहिण प्रांजल, भाउ अजय असे मिळन राहतात, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न २३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, दि. २४.१२.२०२३ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ती व तिचा भाउ प्रवरासंगम येथे पाणी आणण्यासाठी जात होते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, ती व तिचा भाउ जात |

| | |
|---|---|
| | असतांना तुम्ही त्यांचा रस्ता अडविला, त्यामुळे त्यांनी आईला बोलविले, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यामुळे तुम्ही त्यांना लोटुन दिले, तुम्ही त्यांना म्हणाले की, आमचा रोड आहे, तुम्ही येथुन जायचे नाही, डबल आलात तर तंगडे तोडुन देईन, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांनी त्यांचे वडील आल्यानंतर वडीलांना घटनेबाबत सांगितले, त्यानंतर त्यांच्या आई वडीलांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटी तक्रार दाखल केली |
| प्रश्न २७ | **साक्षीदार क्र. ५ अशोक सोन्याबापु कुदळे,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, दि. २४.१२.२०२३ रोजी त्यांची नेमणुक नेवासा पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक या पदावर होती, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न २८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यादिवशी सहाय्यक फौजदार के.आर.साळवे यांनी गु.र.नं. १२२७/२०२३ भा.द.वि कलम ३५४, ५०४, ५०६ चा तपास लेखी आदेशाने त्यांच्याकडे दिला, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न २९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील आदेश दाखविण्यात आला, तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर सहाय्यक फौजदार के.आर.साळवे यांची सही आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे सांगत आहे |
| प्रश्न ३० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, ती सही ते ओळखतात, कारण ते त्यांचे सहकारी होते, सबब सदरील **आदेशास नि. ३४** देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | सांगता येणार नाही |
| प्रश्न ३१ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर दि. २५.१२.२०२३ रोजी त्यांनी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष केला, सदरचे घटनास्थळ हे बकुपिंपळगाव शिवारात शेत गट नं.३३ व ३७ च्या मधुन जाणा-या रस्त्यावर होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा पंचनामा केला आहे |
| प्रश्न ३२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना नि.२१ वरील घ |

| | |
|---|---|
| | घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची व दोन पंचाची सही आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी दोन साक्षीदारांचे जबाब नोंदविले, त्यानंतर त्यांनी तुम्हाला फौ.प्र.सं कलम ४१ (१) ची नोटीस दिली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | जबाब नोंदवले खोटे आहे, ४१(१) नोटीस मिळाली घे |
| प्रश्न ३४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील नोटीस दाखविण्यात आली, ती तीच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची व तुमची सही आहे, सबब सदरील **नोटीसीस नि. ३५** देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खरे आहे |
| प्रश्न ३५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी मा. न्यायालयाला फिर्यादीचे फौ.प्र.सं कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदणीकमी पत्र दिले, त्यांना सदरील पत्र दाखविण्यात आले, ते तेच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची सही आहे, सबब सदरील पत्रास नि.३६ देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | सांगता येणार नाही |
| प्रश्न ३६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांना मा. न्यायालयातुन फौ.प्र.सं कलम १६४ प्रमाणे जबाब प्राप्त झाला तो जबाब त्यांनी दोषारोप पत्रात सामील करुन तुमच्या विरुध्द पुरावा उपलब्ध झाल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, तुम्ही भा.द.वि कलम ३५४, ५०४, ५०६ प्रमाणेचा गुन्हा केला, त्यामुळे त्यांनी तुमच्या विरुध्दचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे |
| प्रश्न ३८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तुम्ही या रस्त्याने जायचे नाही म्हणुन फिर्यादीचा विनयभंग करुन तिला दमदाटी करुन, तिला शिवीगाळ केली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, साक्षीवेळी वेळी तुम्ही न्यायालयात हजर होतात, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खरे आहे |

| | |
|---|---|
| प्रश्न ४० | तुम्हाला शपथेवर जबाब नोंदवायचा आहे काय ? |
| उत्तर | नाही |
| प्रश्न ४१ | तुम्हाला तुमच्या बचावासाठी काही पुरावा दयायचा आहे काय ? |
| उत्तर | नाही |
| प्रश्न ४२ | प्रस्तुत खटल्याबद्दल तुम्हास अजुन काही सांगायचे आहे काय ? |
| उत्तर | खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी, पुर्वीच्या वादातुन खोटी फिर्याद दाखल केली व चुकीचा तपास करुन खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी खोटे दोषारोपपत्र मे. न्यायालयात दाखल केले |

..................
आरोपीची सही

**(डॉ. पी. आर. सुगांवकर)**

दिनांक २५/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, नेवासा.

**प्र मा ण प त्र**

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत आरोपीचा जबाब हा त्याच्या सांगण्याप्रमाणे माझे समक्ष घेण्यात आला व सदरच्या जबाबातील सर्व कथने खरी व बरोबर आहेत.

**(डॉ. पी. आर. सुगांवकर)**

दिनांक २५/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, नेवासा.